# Government College Of Engineering And Research, Avasari Khurd

**Taluka - Ambegaon, District – Pune, 412405**



# E-NEWSLETTER

**(JULY – SEPTEMBER 2023)**


Prof. N. P. Wagh
(Newsletter Incharge)

Prof. Prajakta B. Pimpalkar
(Newsletter Incharge)

Dr. D. R. Pangavhane
(Principal)

## Vision

Educational institution for Empowerment through technological excellence towards sustainable development.

## Mission

- Value based and demand driven education using best practices.
- Promotion of research, innovation and entrepreneurship.
- Commitment to sustainable solutions in service of society.
- Capability to face local and global challenges.



Cover Page Photograph by:
JAYESH SHETE, BE CIVIL 24

### An Appeal to Join Newsletter

You can send your articles, photos, drawings, sketches, technical write up, achievement news, departmental activity on

WhatsApp No. 7875409075 (Ruturaj Aher)

Or send your articles, photos, news at:

ruturaj.aher122020@gcoeara.ac.in

**Committee Members :**

Smt. S. Borbande

## • शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) मधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन दि. ०१ ऑगस्ट, २०२३ ते दि. १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन संपन्न.

**Date : 1st – 15th August 2023**

या स्वच्छता पंधरवड्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सकाळी दोन तास आणि सायंकाळी एक तास अशी स्वच्छता मोहीम सलग पंधरा दिवस महाविद्यालय परिसर, मुलांचे आणि मुलींचे वसतिगृह परिसर, आणि महाविद्यालयाचे मुख्य प्रवेशद्वार ते मुलींचे वसतिगृह परिसर येथे राबविली. या मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांचे विविध १० गट बनवून त्यांना कामे वाटून देण्यात आली. या मोहीमेदरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर, मुलांचे आणि मुलींचे वसतिगृह परिसर, आणि महाविद्यालयाचे मुख्य प्रवेशद्वार ते मुलींचे वसतिगृह परिसर प्लास्टीकच्या पिशव्या, दुभाजकावरील कचरा, तन आणि इतर घनकचरा संकलीत करून स्वच्छ व प्लास्टिक मुक्त केला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने घोषणाबाजी करत या स्वच्छता पंधरवड्यामध्ये श्रमदान करत आपला सहभाग नोंदविला. तसेच स्वच्छता आणि स्वच्छतेचे आपल्या शारिरीक आणि मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्व पटवुन दिले. याशिवाय, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी तेलाचे पत्र्याचे डबे जमा करून त्यांची रंगरंगोटी केली व ते डबे डस्टबिन म्हणून महाविद्यालय परिसरात विद्यार्थी व इतरांच्या वापरासाठी ठिकठिकाणी ठेवले. यासोबतच स्वयंसेवकांनी स्वच्छतेचे संदेश देणारे, डस्टबिन वापराचा संदेश देणारे आकर्षक पोस्टर्स ठिकठिकाणी लावले.

"राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन बरेचसे उपक्रम महाविद्यालय स्तरावर घेतले जातात आणि एक विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक नात्याने आम्हाला सर्वउपक्रमामध्ये आमचे योगदान देण्याची आणि समाजासाठी काहि करू पाहण्याची प्रेरणा मिळते", असे मत सर्व स्वयंसेवकांनी नोंदविले.

सदर स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विदयार्थ्यी समन्वयक **कुमार प्रशांत ढोले**, **कुमारी चारुशीला पानवळ** आणि सर्व रासेयो स्वयंसेवक यांनी केले. याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे** आणि रासेयो **कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगेश पांचाळ** यांचे मार्गदर्शन लाभले.







GPS Map Camera
Pune, Maharashtra, India
XXQ7+J9C Government College Of Engineering And Research, Pune, Maharashtra 410503, India
Lat 18.988874°
Long 73.963243°
23/08/23 04:53 PM GMT +05:30
Google


PLEASE
USE
ME
GCOEARA NSS


03-Aug-2023 5:05:11 pm
Pune Division


03-Aug-2023 5:05:37 pm
Pune Division


USE
DUST
BIN
कचरा पेटी का
उपयोग कीजीये


PLEASE USE
DUSTBIN
GCOEARA NSS


स्वयंचल विभाग
मुलांचे वसतीगृह
Government College Of Engineering And
Government polytechnic college awasari
Google
05-Aug-2023 11:54:41 am
Pune Division
Maharashtra

## • स्थापत्य अभियांत्रिकी विभाग अंतर्गत Different Software Related to Civil Engineering या विषयावर तज्ञ व्याख्यान आयोजित.

**Date : 19th August 2023**

दि. १९ ऑगस्ट २०२२ रोजी स्थापत्य अभियांत्रिकीविभाग अंतर्गत Different Software Related to Civil Engineering या विषयावर तज्ञ व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर तज्ञ व्याख्यान करिता रीशिकेश यांना आमंत्रित करण्यात आले होते. मा. विभागप्रमुख डॉ. वासुदेव देऊळकर, प्रा. आर. एस. तिवारी व ५३ विद्यार्थी या Expert Lecture ला उपस्थित होते. स्थापत्य विभागातील विद्यार्थी अथर्व पाटील, चौथे वर्ष स्थापत्य अभि. याने श्री. रीशिकेश यांचा परीचय करून दिला आणि विभागप्रमुख डॉ. वासुदेव देऊळकर यांनी त्यांचे विभागामार्फत स्वागत केले. विभागप्रमुख डॉ. वासुदेव देऊळकर यांनी सॉफ्टवेयरच्या मदतीने स्थापत्य अभियांत्रिकी या क्षेत्रात कसे यश प्राप्त करता येते या विषयावर आपले मत व्यक्त केले. त्यानंतर श्री रीशिकेश यांनी स्थापत्य अभियांत्रिकी या क्षेत्रात उपयुक्त असणाऱ्या वेगवेगळ्या Software विषयी माहिती दिली व Software चे महत्व त्यांनी सांगितले. सर्वात शेवटी स्थापत्य विभागाचा विद्यार्थी दीपक पाटील तृतीय वर्ष स्थापत्य अभि. याने सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपला असे जाहीर केले.






GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING
AND RESEARCH AVASARI KHURD
Civil Engineering
Expert Lecture
Different software related
To Civil Engineering
DATE 19/08/2023
TIME 1:00 PM
BEST EDUCATION"
VENUE: COMPUTER DEPARTMENT SEMINAR HALL
GCOEARA
CESA
AUTODESK
REVIT
Staad Pro
3 MAX
INDIAN SOCIETY FOR TECHNICAL EDUCATION
ISTE
Civil Engineering
Software Academy

## • शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथे 'मेरी माटी, मेरा देश' या अभियानांतर्गत 'वीरों का वंदन' कार्यक्रम जल्लोषात साजरा.

**Date : 19th August 2023**




भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'मेरी माटी, मेरा देश' या उपक्रमांतर्गत शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून भारतीय सैनिकांच्या अतुलनीय शौर्याला समर्पित "विरों का वंदन" या उल्लेखनीय कार्यक्रमाचे शनिवार, दि. १९ ऑगस्ट, २०२३ रोजी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्लन, प्रतिमा पूजन रोपट्यास जलार्पण करुन राष्ट्रीय सेवा योजना लक्षगीत गायनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे यांनी भूषविले. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व वंदनमुर्ती म्हणून माजी सैनिक श्री. ज्ञानेश्वर डोके, श्री. गुलाब शिंदे, श्री.दत्तात्रय कराळे, श्री. संजय खेडकर, श्री. माणिक शिंदे, श्री. सुर्यकांत भोर, श्री. हनुमंत भोर यांची उपस्थिती लाभली. प्रमुख पाहूणे म्हणून लाभलेल्या सर्व माजी सैनिकांचे जोश पूर्ण स्वागत राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक शेषराव गुंड याने आपल्या भाषणाने व सुजाता बिरादार हिने सैनिकांवर लिहिलेली स्वरचीत कवितेने करण्यात आली. प्रमूख पाहुण्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमामध्ये आंबेगाव परिसरातील माजी सैनिकांचा सन्मान शाल, श्रीफळ व देशी वृक्षांची रोपे देऊन करण्यात आला. त्यांचे बहुमोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. सैन्यदलातील श्री. ज्ञानेश्वर डोके यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी भान ठेऊन नियोजन केलं पाहिजे आणि बेभान होऊन ते अमलात आणल पाहिजे असे सांगितले. त्याचबरोबर वायुदलातील श्री. सूर्यकांत भोर यांनी त्यांचा शैक्षणिक प्रवास विद्यार्थ्यांना सांगितला. तसेच आरोग्य आणि शिस्त याबद्दलही मोलाचे मार्गदर्शन केले. नौदलातील श्री. संजय खेडकर यांनी शत्रूशी लढताना झालेल्या चकमकीचे किस्से विद्यार्थ्यांना सांगितले.

भारतीय सैन्यदल, वायुदल आणि नौदल या संरक्षण दलांमधील विस्मयकारक कथा जाणून घेण्याची आणि रणांगणावरील त्यांचे धाडसी क्षण पुन्हा जिवंत करण्याची अनोखी संधी या कार्यक्रमाने महाविद्यालयातील विद्यार्थी व माजी सैनिक यांना दिली. या कार्यक्रमाच्या आयोजनातून आपल्या देशाच्या अखंडतेचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करणाऱ्या वीरांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये देशप्रेम, देशाच्या विकासासाठी युवकांचे योगदान तसेच ध्येय प्राप्तीसाठी गरजेचे असलेले सातत्य, चिकाटी, मेहनत, शिस्त अशा अनेक गोष्टींचे मंथन झाले. कार्यक्रमाची सांगता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे यांच्या अध्यक्षीय मार्गदर्शनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कुमारी निकिता गोरे आणि कुमार प्रतीक पाटील यांनी केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी समन्वयक कुमार प्रशांत ढोले, कुमारी चारुशीला पानवळ आणि सर्व रासेयो स्वयंसेवक यांनी केले. याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगेश पांचाळ यांचे मार्गदर्शन लाभले.




मिट्टी को नमन, वीरों का वंदन
राष्ट्रीय सेवा योजना


GPS Map Camera
Pimpalgaon Tarf Mahalunge, Maharashtra, India
XXP7+XX6, Pimpalgaon Tarf Mahalunge, Maharashtra 410503, India
Lat 18.987376°
Long 73.964718°
19/08/23 12:57 PM GMT +05:30
Google




- **शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथे AICTE च्या MeriLiFE: Massive Tree Plantation Drive 2023च्या अनुषंगाने वृक्षारोपण उत्साहात साजरा.**

**Date : 25th August 2023**

**AICTE** च्या **MeriLiFE: Massive Tree Plantation Drive 2023** च्या अनुषंगाने महाविद्यालयामध्ये **वृक्षारोपणाचा सामाजिक उपक्रम** दि. २५/०८/२०२३ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एन. एस. नेहे यांच्या हस्ते करण्यात आले व त्यांनी वृक्षारोपण करून या कार्यक्रमाची सुरुवात केली. महाविद्यालय



परिसर निसर्ग रम्य आहे, तसेच या वृक्ष लागवडीमुळे महाविद्यालयाचे नंदनवन होणार आहे असे प्रतिपादन मा. प्राचार्य यांनी केले.सदर कार्यक्रमासाठी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी तसेच विदयार्थी यांनी वृक्षारोपण करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सदर सोहळ्यामध्ये विविध प्रकारच्या १०० रोपांची लागवड करण्यात आली. त्यामध्ये, प्रध्यानाने आंबा, चिंच, आवळा, जांभूळ, वड, साग, बांबू यांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयीन स्वच्छता व बाग बगीचा संगोपन समिती यांनी केले होते.




A

## • Government College of Engineering and Research Avasari (Kh), Computer Engineering Department hosts highly informative Java Session led by Industry Experts.

**Date : 26th August 2023**

Students Gain Valuable Insights into Java Programming and Industry Best Practices

The Computer Engineering Department at Government College of Engineering and Research Avasari recently hosted a highly anticipated Java Session conducted by industry experts, offering students a unique opportunity to expand their knowledge and expertise in Java programming. The event, attended by enthusiastic students of BE and TE and faculty members, proved to be an invaluable experience for those looking to enhance their skills in the ever-evolving field of computer engineering.

The session took place on 26th August 2023 at the Computer Departments Classroom. It featured distinguished industry professionals with extensive experience in Java development, who shared their insights, best practices, and real-world applications of Java programming.

The name of Industry experts/trainers :

1. Rahul Sale
   -Working in FIS Global as a Java Developer having 5+ years experience in java development.
2. Rahul Shinde
   -Working in FIS Global as a Java Developer having 5+ years experience in java development.




**Insightful Java Session led by Industry Experts.**

## • शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून दि. १४ सप्टेंबर, २०२३ रोजी विशेष नवमतदार नोंदणी अभियान संपन्न.

**Date : 14th September 2023**




महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर नवमतदार नोंदणी व्हावी, तसेच प्रत्येक पात्र विद्यार्थ्यांचे नाव मतदार यादीमध्ये समाविष्ठ व्हावे याकरिता मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत सर्व महाविद्यालयांमध्ये दि. १४ सप्टेंबर, २०२३ रोजी 'विशेष नवमतदार नोंदणी अभियान' राबविण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून दि. १४ सप्टेंबर, २०२३ रोजी विशेष नवमतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले.


भारत निवडणूक आयोगाने दि. १ जानेवारी, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक प्रक्रिया सर्वसमावेशक व्हावी यासाठी हा कार्यक्रम महत्वाचा आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार नागरिकांना वर्षातून चार वेळा म्हणजेच १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै, १ ऑक्टोबर या अर्हता दिनांकावर मतदार नोंदणी करता येणार आहे.

मतदार यादी हा लोकशाहीचा पाया असून ती सशक्त करण्यासाठी मा. भारत निवडणुक आयोग तसेच मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्या निर्देशानुसार शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय, अवसरी खुर्द येथे नवमतदारांची नोंदणी करण्यासाठी "विशेष नवमतदार नोंदणी अभियान" दि. १४ सप्टेंबर, २०२३ रोजी राबविण्यात आले.

यामध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी मतदारांची नोंदणी वाढविण्याकरिता मतदारांमध्ये जनजागृती करून नवमतदारांची ऑनलाईन नोंदणी केली. मतदार यादी अदयावत करणे हे राष्ट्रीय कर्तव्य असून सदर कर्तव्यामध्ये महाविद्यालयाने बहुमोल सहभाग दाखविला. या अभियानांतर्गत महाविद्यालयातील १५० नवमतदारांची नोंदणी करण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी समन्वयक **कुमार प्रशांत ढोले, कुमारी चारुशीला पानवळ** आणि सर्व रासेयो स्वयंसेवक यांनी केले. याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे** व रासेयो **कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगेश पांचाळ** यांचे मार्गदर्शन लाभले.






- **विशेष नवमतदार नोंदणी अभियानांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची ऑनलाईन नावनोंदणी करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी.**

# • Avishkar-2023.

## (Institute Level Innovative Ideas Project Posters Competition)

**Date : 25$^{th}$ September 2023**

Government College of Engg. & Research, Avasari (Khurd.) has organised Institute level round for Innovation Ideas Project Poster presentation competition Avishkar 2023 on 25th September 2023 with a good turnout from students across all disciplines. This competition was held as per the guidelines from Savitribai Phule Pune University. Total 25 excellent Innovative idea project posters were selected for the competition from various departments of the Institute. The competition was inaugurated by the hands of Dr. D. R. Panghavane, Principal, Govt. COE, Avasari. This Institute level round for "Avishkar-2023" was conducted by Research team of GCOEARA Awasari under the guidance of Dr. M. S. Nagmode, Academic and Research Coordinator. In Institute level round the innovative ideas best project posters were selected from participants, based on Judges' evaluation. The project posters were judged by Senior and Doctorate Professors. All The Heads of department and faculty members as well as students were present for the event. The competition was held through the display of projects using posters and models. All the faculty members, students and the staff were invited to visit the venue of competition and motivated the students through the technical discussion by interacting with them.

Total 7 groups selected amongst 25 groups for zonal level competition as given below.

**Category: Engineering and Technology**

1. Semi automatic window glass breaking device (Sagar Dhobale, Prajakta Londhe, Amit Karote, Ashish Auti)
2. Semiautomatic Manipulator Arm (Ramchandra Potadar, Ganesh Mali, Siddhesh Khobragade, Sakshi Gunjal).

**Category: Agriculture and Animal Husbandry**

1. Plant Growth Rate Enhancement Using Electromagnetic Field Control Device (Vaibhav Mahadik, Ganpat Tormal, Charushila Panwal)
2. Generating electricity from waste materials (Tanmay Ahire, Hruddhi Bhagwat, Jalil Andewadi)

**Category: Humanities Languages, Fine Arts etc**


1. Bioremediation (Vishal Shinde, Aishwarya Suryavanshi, Prathamesh Madne, Priyanka Ghodke)

2. Automated fire detector and extinguisher (Janhavi Kiran Deshpande, Swaroopa Sanjay Kanade, Aditya Hemant Zagade, Rahul Anil Shinde)

**Category: Pure Sciences**

1. Ionic Propulsion (Vibhanshu Hire, Venu Jangam, Omkar Kanekar, Abhishek Sonune)



• शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अंतर्गत हॅकाथॉन स्पर्धेमध्ये नावीन्य आणि प्रतिभा दिसली.

**Date : 26th September 2023**

शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय, अवसरी येथे दि. 26 सप्टेंबर 2023 रोजी आनंददायक वातावरणात “अंतर्गत हॅकाथॉन” स्पर्धेचे आयोजन केले होते, ज्यामध्ये संपूर्ण कॅम्पसमधील तंत्रज्ञानप्रेमींच्या 32 संघांना एकत्र आणले. यात एकूण 192 विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवला गेला. SIH-2023 केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल आणि AICTE द्वारे विद्यार्थ्यांमध्ये नाविन्य आणि समस्या सोडवण्याला चालना देणारा उपक्रम आहे. संगणक विभागाच्या हॅकाथॉन क्लबने आयोजित केलेला हा कार्यक्रम संगणक विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे सर आणि सर्व विभाग प्रमुखांच्या उपस्थितीमध्ये झाले. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संबोधन केले, त्यांनी भविष्य घडवण्यात तंत्रज्ञानाच्या महत्त्वाच्या भूमिकेवर भर दिला आणि विद्यार्थ्यांना नाविन्याच्या सीमा पार करण्यासाठी प्रोत्साहित केले. उद्घाटन समारंभात संगणक विभागाचे विभागप्रमुख डॉ. शशी घुंबरे यांनी त्यांच्या भाषणामध्ये तंत्रज्ञानाच्या झपाट्याने विकसित होत असलेल्या क्षेत्रात सतत शिकणे आणि नवनवीन शोध घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. शशी घुंबरे यांनी उपस्थितांना आव्हाने स्वीकारण्यास, प्रभावीपणे सहयोग करण्यास आणि हॅकाथॉन दरम्यान चौकटीबाहेर विचार करण्यास प्रोत्साहित केले. संगणक विभागाचे प्राध्यापक डॉ. संदीप थोरात यांनी कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात डॉ. थोरात यांनी स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (SIH-2023) चा एक भाग म्हणून आयोजित केलेल्या अंतर्गत हॅकाथॉन स्पर्धेत सहभाग घेतल्याबद्दल सर्व स्पर्धक, मान्यवर परीक्षक, इतर विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त केले.

दिवसभर, प्रत्येक संघानेत्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना आणि प्रकल्प परीक्षकांच्या पॅनेलसमोर सादर केल्याने सर्व उपस्थित श्रोते उत्साहित झाले. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबरसुरक्षा, मोबाइल डेव्हलपमेंट आणि शाश्वत तंत्रज्ञान सोल्यूशन्स यासह विविध डोमेनमध्ये या कल्पनांचा विस्तार करण्यात आला आहे. हॅकाथॉन हे नावीन्यपूर्णतेला चालना देण्याच्या आणि विद्यार्थ्यांना त्यांचे तांत्रिक कौशल्य दाखवण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या महाविद्यालयाच्या वचनबद्धतेचा पुरावा होता. हे विद्यार्थ्यांना त्यांचे वर्गातील ज्ञान व्यावहारिक, वास्तविक-जागतिक परिस्थितींमध्ये लागू करण्याची संधी म्हणून काम करते. अंतर्गत हॅकाथॉन स्पर्धेने हे स्मरण करून दिले की महाविद्यालय तांत्रिक प्रगतीत आघाडीवर आहे, टेक लीडर्स आणि इनोव्हेटर्सच्या पुढील पिढीचे पालनपोषण करत आहे. अशा कार्यक्रमांद्वारे, शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय, अवसरी विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण देत नाही तर त्यांना तंत्रज्ञानाच्या अमर्याद शक्यतांचा शोध घेण्यासाठी प्रेरित करत आहे.




Government College Of Engineering
COMPUTER ENGINEERING DEPARTMENT
Proudly Presents
2023






SMART INDIA HACKATHON 2023

